05-02-2025-Dai-01AAA_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/04/2025 11:08 PM Page 1



पार्सेत घराला आग; तीन लाखांपेक्षा जास्त नुकसान पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारत-पाकिस्तान सामना २३ रोजी दुबईमध्ये

वेर्णा, बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 154 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 5 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### शशी थरूर यांना दिलासा

नवी दिल्ली, दि. ४ : भाजप नेते राजीव चंद्रशेखर यांनी काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्याविरुद्ध दाखल केलेला फौजदारी मानहानीचा दावा दिल्ली न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावला. तसेच शशी थरूर यांना याबद्दल समन्स बजावण्यास देखील न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे.

दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टातील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी पारस दलाल यांनी सुनावणीनंतर हा खटला फेटाळला आहे. यावेळी त्यांनी म्हटले आहे की, शशी थरूर यांच्याविरोधातील तक्रारीत मानहानीचे कोणतेही घटक सिद्ध झाले नाहीत. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारे समन्स बजावण्यात येत नाही. भाजप नेते चंद्रशेखर यांनी थरूर यांच्यावर राष्ट्रीय दूरचित्रवाणीवर खोटे आणि अपमानजनक भाष्य केल्याचा आरोप केला होता. तसेच त्यांनी थरूर यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तिरुवनंतपुरम मतदारसंघातील मतदारांना लाच दिल्याचा आरोप देखील केला होता. हे आरोप खोटे आहेत हे माहित असूनही चंद्रशेखर यांनी थरूर यांचे विधान त्यांनी प्रतिष्ठा वाढवण्यासाठी आणि निवडणूक निकालांवर प्रभाव पाडण्यासाठी केले होते असा दावा देखील केला.

----------------

### अमेरिका करणार युक्रेनला मदत

**वॉशिंग्टन, दि. ४ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धात मदत सुरू ठेवण्याच्या बदल्यात दुर्मिळ खनिजांच्या बाबत युक्रेनशी करार करण्याबद्दल बोलले आहे. ट्रम्प यांनी ओव्हल ऑफिसमध्ये माध्यमांना सांगितले की अमेरिकेने युक्रेनला त्याच्या युरोपीय मित्र राष्ट्रांपेक्षा जास्त लष्करी आणि आर्थिक मदत पाठवली आहे. आम्हाला युक्रेनसोबत असा करार करायचा आहे ज्याअंतर्गत ते त्यांच्या दुर्मिळ खनिजांचे आणि इतर महत्त्वाच्या संसाधनांचे संरक्षण करेल. ट्रम्प म्हणाले की, त्यांना युक्रेनियन सरकारकडून संदेश मिळाला आहे की ते अमेरिकेला आधुनिक तांत्रिक अर्थव्यवस्था बनवण्यास मदत करण्यासाठी दुर्मिळ पृथ्वी सामग्रीवर करार करण्यास तयार आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी माध्यमांना सांगितले की, मला दुर्मिळ खनिजांच्या पदार्थांचे संरक्षण हवे आहे. आम्ही शेकडो अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करत आहोत. त्यांच्याकडे खरोखरच उत्तम दुर्मिळ खनिज आहेत.

----------------

### दोन मालगाड्यांची उत्तरप्रदेशात धडक

फतेहपूर, दि. ४ : उत्तर प्रदेशमधील फतेहपूर जिल्ह्यात मोठी रेल्वे दुर्घटना टळली आहे. येथे एकाच ट्रॅकवर दोन मालगाड्या आल्या अन् जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की इंजिन रेल्वे रूळावरून खाली कोसळले. या अपघातामध्ये चालक आणि को पायलट गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन मालगाड्या एकाच पटरीवर आल्यामुळे हा भीषण अपघात झाला. घटनेचे कारण तपासले जात आहे.
हा अपघात फतेहपूर जिल्ह्यातील खगा कोटवाली येथील पँबपिपूरजवळ झाला. अपघातानंतर दोन मालगाड्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### हवामान

कमाल : २९ किमान : २१
आर्द्रता : ७२

### बाजार भाव

सोने : ₹ ८५,३१५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९८,५०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७८,५८३ .२५↑ (३७८.२१)
निफ्टी : २३,७३९.२५ ↑ (१३९७.०७)

# ३१ मार्चपर्यंत स्मार्ट सिटीची कामे पूर्ण करणार असल्याचा दावा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ४ : इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड ने ३५ स्मार्ट सिटी प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले असून उर्वरित नऊ - रस्त्यांच्या कामांसह ३१ मार्च २०२५ या पूर्वी घोषित केलेल्या अंतिम मुदतीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे आयपीएससीडीएलचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ संजित रॉड्रिग्ज यांनी मंगळवारी सांगितले.**

आल्तिनो येथे पत्रकार परिषदेत बोलताना रॉड्रिग्ज यांनी आश्वासन दिले की, रस्त्यांशी संबंधित प्रकल्प योग्य दिशेने सुरू आहेत. रस्त्यांचा प्रश्न आहे, तर आम्हाला ३१ मार्चच्या अंतिम मुदतीबद्दल खात्री आहे. सांडपाण्याच्या कामाच्या बाबतीत, सांतइनेज आणि ताडमाड येथील प्रमुख कामे दिलेल्या वेळेत सुरू आहेत. रस्त्यावर जनतेला गैरसोय होऊ नये, अशी आमची इच्छा आहे. फुटपाथचे काम हाती घेतले जाईल, परंतु सेवांचे स्थलांतर हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. याव्यतिरिक्त, नाले साफ करणे हे प्राधान्य आहे, असे त्यांनी सांगितले.

स्मार्ट सिटी कामांमुळे पाण्याच्या पाईपलाईनला झालेल्या नुकसानाबाबतच्या चिंतेला उत्तर देताना, रॉड्रिग्ज यांनी ही समस्या मान्य केली. परंतु, दुरूस्तीसाठी जलद प्रतिसाद देण्यावर भर दिला. पाईप्स आणि केबल्स खराब झाले आहेत, परंतु आम्ही दुरुस्तीची कामे तातडीने करतो आणि तक्रारींना प्रतिसाद देतो. आमचा प्रतिसाद वेळ नेहमीच लोकांच्या अपेक्षा पूर्ण करत नसला तरी, लोकांना समजते की आम्ही कायमस्वरूपी उपाय शोधत आहोत, असे ते म्हणाले.

रॉड्रिग्ज यांनी पुढे अधोरेखित केले की, स्मार्ट सिटी बोर्ड पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या देखभालीसाठी धोरण तयार करत आहे. प्रकल्प देखभाल आणि पूर्ण झाल्यानंतर हस्तांतरण याबाबत काही समस्या आहेत. मुख्यमंत्री लवकरच आढावा घेतील. या दरम्यान या कामाला अंतिम रूप दिले जाईल. अनेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत किंवा पूर्ण होण्याच्या जवळ आहेत, असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री सध्या विधानसभेच्या अधिवेशनात व्यस्त असताना, स्मार्ट सिटी प्रकल्पांच्या देखभालीसाठी लवकरच एक आढावा बैठक आयोजित केली जाईल. सरकार योग्य देखभाल सुनिश्चित करण्यात सक्रियपणे गुंतलेली आहे, असे रॉड्रिग्ज यांनी आश्वासन दिले.

रॉड्रिग्स यांनी आयपीएससीडीएलच्या कंडक्टर-लेस तिकीट प्रणालीकडे संक्रमणाबद्दल देखील सांगितले. आम्ही ही प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू करत आहोत आणि तीन मार्ग आधीच कंडक्टर-लेस झाले आहेत. फक्त कार्ड आणि डिजिटल पेमेंट स्वीकारल्यामुळे सुरुवातीला प्रवाशांची संख्या कमी झाली आहे, परंतु जनता हळूहळू जुळवून घेत आहे. टॅप-इन, टॅप-आउट यंत्रणेद्वारे अखंड प्रवेश आणि निर्गमन सक्षम करणे हा मुख्य उद्देश आहे. परिस्थितीचे निरीक्षण केले जात आहे, त्यांनी स्पष्ट केले.

सीईओंनी स्पष्ट केले की आयपीएससीडीएल ऑक्टोबरमध्ये काही कामे सुरू करणार होते, परंतु,

पान २ ▶

### टप्प्यात सुरू असलेली कामे

टप्पा पहिला : (७३५ मीटर), ज्यामध्ये एमजी रोड (सांतइनेज जंक्शन ते काकुलो आयलंड), एमजी रोड (डॉन बॉस्को स्कूल ते काकुलो आयलंड) आणि स्वामी विवेकानंद रोड यांचा समावेश आहे, २ जानेवारी २०२५ रोजी सुरू झाला आणि २० जानेवारीच्या अंतिम मुदतीपूर्वी पूर्ण झाला.

टप्पा दुसरा : (१,०२४ मीटर), जो १८ जानेवारी २०२५ रोजी सुरू झाला, ज्यामध्ये एमजी रोड, टीबी कुन्हा रोड, १८ जून रोड आणि कुन्हा रिवारा रोड यांचा समावेश आहे, तो ७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

टप्पा तिसरा (१,४१५ मीटर) : ८ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत नियोजित आहे.

टप्पा चौथा : (५३० मीटर) १ मार्च ते ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविला जाईल.

टप्पा पाचवा : (१ मे ते ३१ मे २०२५) मध्ये पूर्ण झालेल्या रस्त्यांवर बिटुमिनस काँक्रीट (बीसी) टाकणे आणि रस्ता रंगवणे समाविष्ट आहे. या वेळेनुसार दाट बिटुमेन मॅकॅडम (डीबीएम) थराचे निराकरण आणि रस्ते बंद न करता आवश्यक दुरुस्ती करण्याची परवानगी मिळते.

टप्पा सहावा : (१ जून ते ३० जून २०२५) मध्ये लँडस्केप डेव्हलपमेंट आणि वृक्षारोपण यावर लक्ष केंद्रित केले जाईल, जे रस्त्यावरील वाहतुकीवर परिणाम न करता वनस्पतींचे जगण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी नियोजित आहे.

# १.५६ कोटी मतदार ठरविणार ६९९ उमेदवारांचे भवितव्य!

## दिल्ली विधानसभेसाठी आज मतदान 'आप'ची प्रतिष्ठा पणाला

**नवी दिल्ली, दि. ४ :** देशाची राजधानी दिल्लीत उद्या बुधवारी विधानसभेच्या ७० जांगासाठी मतदान होईल. त्यामुळे दिल्लीकर त्यांचा कौल देण्यासाठी सज्ज झाले आहेत. दिल्लीत कोण बाजी मारणार ते ८ फेब्रुवारीच्या निकालातून स्पष्ट होईल. एकूण ६९९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. त्यांचे भवितव्य सुमारे १.५६ कोटी मतदार ठरवतील. दिल्लीत अनेक राजकीय पक्षांची आणि अपक्ष उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. अर्थात, खरी लढत आप, भाजप आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांमध्येच आहे. सलग दोन कार्यकाळांपासून अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्ष दिल्लीत सत्तेवर आहे. त्यामुळे आप सरकारच्या कामगिरीविषयीचे जनमत निवडणुकीच्या माध्यमातून समजेल. त्याशिवाय, भाजप आणि काँग्रेसचे पुढील ५ वर्षांसाठी दिल्लीतील राजकीय भवितव्य काय असेल तेही स्पष्ट होईल.

लोकसभा निवडणुकीत इंडिया ब्लॉकचा भाग असलेले पाच पक्ष एकमेकांविरुद्ध निवडणूक लढवत आहेत. यापैकी सर्व ७० जागांवर आम आदमी पक्ष (आप) आणि काँग्रेस आमनेसामने आहेत. त्याचवेळी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ६ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत, भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी लेनिनवादी यांनी प्रत्येकी २ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत.भाजपने ६८ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. युती पक्षांना दोन जागा देण्यात आल्या आहेत. यामध्ये जनता दल-युनायटेडने बुरारी येथून आपला उमेदवार उभा केला आहे आणि लोक जनशक्ती पक्ष-रामविलासने देवली मतदारसंघातून आपला उमेदवार उभा केला आहे. महाराष्ट्रात भाजपचा मित्रपक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ३० जागा लढवत आहे. शिवसेना प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जागांवर भाजपला पाठिंबा दिला आहे. याशिवाय बहुजन समाज पक्ष ७० जागांवर आणि असदुद्दीन ओवैसी यांचा ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन १२ जागांवर निवडणूक लढवत आहे.

सरकारने केलेली कामगिरी, दिल्लीकरांना खुष करणाऱ्या योजनांची अंमलबजावणी आदींच्या जोरावर सत्ता राखण्याचा विश्वास आपकडून व्यक्त केला जात आहे. भाजप तब्बल २ तपांपासून दिल्लीच्या सत्तेपासून दूर आहे. मात्र, ती कसर यावेळी भरून काढण्यासाठी तो पक्ष पूर्ण ताकदीने मैदानात उतरला आहे. काँग्रेसला मागील २ विधानसभा निवडणुकांत एकही जागा जिंकता आली नाही. त्या नामुष्कीचा शिक्का पुसून चकित करणारी कामगिरी करून दाखवण्याचा चंग त्या पक्षाने बांधला आहे. दिल्ली विधानसभा संख्याबळाच्या दृष्टीने छोटी आहे. मात्र, ती देशाच्या राजधानीचे प्रतिनिधित्व करत असल्याने संबंधित निवडणुकीला मोठे राजकीय महत्व प्राप्त झाले आहे.



### मतदानासाठी १३ हजार ७६६ मतदान केंद्रे

दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यानुसार, दिल्लीत मतदानासाठी १३ हजार ७६६ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. ८३.७६ लाख पुरुष, ७२.३६ महिला आणि १२६७ तृतीय लिंग मतदार आहेत. दिव्यांगांसाठी ७३३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

# धनंजय मुंडेकडून १६१ कोटींचा घोटाळा?

## दमानियांचा सर्वात मोठा बॉम्ब; राजीनामा द्यावाच लागेल'

**मुंबई, दि. ४ :** धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना १६१.६८ कोटी रुपयांचा घोटाळा झाला असल्याचा गौप्यस्फोट असा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. यामुळे मुंडे यांचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. आज पत्रकार परिषद घेऊन त्यांनी हा गौप्यस्फोट केला आहे.

दमानिया यांनी म्हटले आहे की, 'एक कृषी मंत्री शेतकऱ्यांचे किती पैसे खातो याबाबत मी आज पुरावे देणार. उद्दढ ही योजना सरकारने काढली होती. या योजनेचे पैसे लोकांपर्यंत पोहोचत नाही त्यासाठी सरकारने उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यासाठी एक ऋठ काढण्यात आला होता. १२ एप्रिल २०१८ रोजीचा जीआर मुख्यमंत्र्यांना ही जी ६२ आयटम्सची लिस्ट आहे जे डीबीटी खाली येणार आहे. त्या ६२ आइटमला ॲड करण्याची मुभा ही मुख्यमंत्र्यांना आली आणि म्हणजे यातून काही आइटम वगळू शकत नाही पण मुख्यमंत्री त्यात ॲड करू शकतात. जर यातील काही आइटम वगळायचे असतील तर एक कमिटी बनविण्यात आली होती'

'आपल्याकडे काही विक्रमी प्रोडक्शन केले. त्यात १000 कोटींचा आकडा आला.१२ मार्च २०२४ रोजी एक जीआर आला की नियंत्रण सर्व कृषी अधिकारी करतील. तेव्हा अधिकारी प्रवीण गेडाम होते. त्यांनी म्हटल चखऊउ हे बीज बनवत नाही. त्यामुळं त्यांनी म्हंटल की जी बीज आपण बनवत नाही त्याचे पैसे थेट शेतकऱ्याला द्यायला हवे. पण यावर धनजय मुंडे म्हणतात डायरेक्टरला फोन करतात आणि बोल करतात. यात मग अधिकारी म्हटले मुख्यमंत्र्यांकडे जावं लागेल. यात मुख्यमंत्र्यांना नेमकं काय प्रकरण हे माहीत नसावे. अजित पवार उपमुखमंत्री होते त्यांनी सही केली म्हणून मुख्यमंत्र्यांनी केली. तेव्हा मुख्यमंत्री शिंदे होते,' असे दमानिया यांनी म्हटले आहे. १८४ लिटरची नॅनो युरियाची बॉटल ९२ रुपयांची आहे. पण कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जे टेंडर काढलं गेलं त्यात तब्बल २२० रुपयांना ही बॉटल विकत घेतली गेली. कृषीमंत्री यांनी १९ लाख ६८ हजार ४०८ बॉटल्स या २२० रुपयांनी घेतल्या. दुपट्टीपेक्षा जास्त किंमतीने बॉटल्स विकत घेतल्या. चर ५०० रुपयांच्या बॉटलचा बाजारभाव २६९ रुपये पण ५९० रुपयांना त्याची खरेदी केली आहे. या दोन गोष्टींचा एकूण घोटाळा ८८ कोटींचा आहे.

बॅटरी स्प्रेअर हा आधीपासून चरळवलच्या वेबसाइटवर मिळतोय आत्ताच्या घटकेला २४५० रुपयांना घेतला जातोय. पण माननीय कृषीमंत्री ३४२६ रुपयांचा टेंडर विकत घेताय. एक हजाराच्या वर बॅटरी स्प्रेअरवर कमवले आहेत. जवळपास २ लाख ३६ ४२७ बॅटरी स्प्रेअर विकत घेतले आणि त्याची किंमत ३ हजारवर आहे. जुलै २३ ते नोव्हेंबर २४ एका वर्षात या व्यक्तीने इतका अफाट पैसा तो पण शेतकऱ्यांचा पैसा खाल्ला असेल तर अशा लोकांना त्या पदावर राहण्याची त्यांचे मंत्रीपद ठेवण्याची खरंच गरज आहे का. याचा विचार मुख्यमंत्र्यांनी केला पाहिजे, असा आरोपही दमानियांनी केला आहे. एकूण १६१.६८ कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे, असे दमानियांनी म्हटले आहे.

# गोमांस निर्यातीवरून गोवा काँग्रेसची सरकारवर टीका

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ४ : गोवा काँग्रेसने राज्य सरकारवर स्थानिक पुरवठ्यापेक्षा गोमांस निर्यातीला प्राधान्य दिल्याचा आरोप केला आहे, या निर्णयामुळे गोमांसाची कमतरता निर्माण झाली आहे आणि जातीय तणाव वाढला आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

गोवा सरकारने अलीकडेच कर्नाटकस्थित सनफेस ॲग्रोफूड्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सहकार्याने गोवा मीट कॉम्प्लेक्सद्वारे इराकला २८.५ टन गोमांस पाठवून राज्याची पहिली गोमांस निर्यात सुलभ केल्यानंतर हा वाद निर्माण झाला. व्यवस्थापकीय संचालक राजेश केणी यांनी गोव्याचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पहिले गोमांस शिपमेंट म्हणून याची पुष्टी केली.

मंगळवारी पत्रकार परिषदेत, काँग्रेस नेते सावियो कुतिन्हो, वकील स्नेहल ओंस्कर, आर्किटेक्ट कार्लोस ग्रासियास, लिंकन गोम्स, दामोदर ओंस्कर, अन्वर नारू, रॉबर्ट वाझ, अनिल अल्वारेस आणि कॅमिलो कॅमारा यांच्यासमवेत, सरकारच्या निर्णयावर टीका केली आणि हा निर्णय ढोंगी आणि स्थानिक ग्राहकांसाठी हानिकारक असल्याचे म्हटले. नाताळच्या हंगामात निर्यात उपक्रमामुळे गोमांसाचा तुटवडा निर्माण झाला का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांनी मडगावमधील अलिकडच्या घटनांचा उल्लेख केला, ज्यामध्ये शिरोडा येथे एका व्यापाऱ्याचा छळ झाल्याचा समावेश आहे. त्यांनी एसजीपीडीए मार्केटमध्ये झालेल्या पूर्वीच्या वादाचाही उल्लेख केला, जिथे गोमांस वाहतुकीदरम्यान झालेल्या शारीरिक हल्ल्यामुळे नाताळच्या आधी व्यापाऱ्यांनी तात्पुरता संप पुकारला होता.

काँग्रेस नेत्याने केवळ म्हशीचे मांस निर्यात केले जात असल्याचा सरकारचा दावा असूनही, वाहने थांबवून मांसाला गाईचे मांस घोषित करण्यावरही चिंता व्यक्त केली. या तपासणींना कोण अधिकृत करते यावर त्यांनी स्पष्टीकरण मागितले आणि सरकारच्या निर्यात धोरणामागील आर्थिक हेतूंवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. याव्यतिरिक्त, कुतिन्हो यांनी सनफेस ॲग्रोफूड्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वैधतेवर शंका उपस्थित केली, असा आरोप केला की ऑनलाईन शोधात कंपनी कायमस्वरूपी बंद असल्याचे दिसून आले आहे, ज्यामुळे निर्यात करारातील तिच्या भूमिकेबद्दल शंका निर्माण झाली आहे.

ओंस्कर यांनी सरकारवर गोमांस निर्यातीतून नफा मिळवतानाच फुटीरतावादी अजेंडा चालवण्याचा आरोप केला. त्यांनी मांस व्यापाराच्या महसुलातून फायदा मिळवताना गोरक्षणाबाबत सरकारच्या भूमिकेतील विरोधाभासाकडे लक्ष वेधले.

दरम्यान, गोव्यात गोमांस ग्राहकांना पुरवठ्यातील तीव्र टंचाईचा सामना करावा लागत आहे. मंगळवारी एसजीपीडीए किरकोळ बाजारात येणाऱ्या पर्यटकांना मर्यादित प्रमाणात गोमांस उपलब्धता आढळली, व्यापाऱ्यांनी उत्तर गोव्यातही पुरवठा कमी असल्याचे सांगितले. पर्यटन हंगामात स्थानिक अल्पसंख्याक समुदाय आणि आतिथ्य उद्योगावर या कमतरतेचा परिणाम होत आहे. काँग्रेस पक्षाने सरकारला निर्यातीपेक्षा स्थानिक पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे आणि त्यांच्या व्यापार व्यवहारांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्याचे आवाहन केले आहे. गोमांस व्यापारी आणि ग्राहकांच्या चिंता दूर करण्याचे आवाहनही पक्षाने प्रशासनाला केले आहे.

# सोन्याच्या दरातली वाढ गुंतवणूकीला पर्याय ठरेल का?

**नवी दिल्ली, दि. ४ :** गेल्या दोन दिवसात सोन्याच्या दरात प्रचंड वाढ झाल्याने सोने हा गुंतवणुकीसाठी सुरक्षित पर्याय उरलाय का याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.मंगळवारी सोन्याचा दर काही ठिकाणी ८५ हजारावर गेला. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून जगभरातील शेअर बाजारात गोंधळाचे वातावरण आहे आणि 'सुरक्षित गुंतवणूक' समजल्या जाणाऱ्या सोन्याबाबत लोक इंटरनेटवर असे प्रश्न शोधत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे.

एकीकडे सोन्याच्या किमती वाढत आहेत, तर दुसरीकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाची कमजोरी आहे. सोमवारी रुपयाने विक्रमी नीचांकी पातळी गाठली होती. डॉलरच्या



तुलनेत ५५ पैशांच्या घसरणीसह तो ८७.१७ वर बंद झाला. म्हणजेच एका डॉलरची किंमत ८७ रुपये १७ पैशांवर पोहोचली होती.अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी मेक्सिको, कॅनडा आणि चीनवर नवे शुल्क लादणे आणि जगभरातील शेअर बाजारातील घसरलेले वातावरण हे याचे कारण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

ट्रम्प प्रशासनाच्या या कठोर उपायांमुळे जगभरात महागाई वाढण्याची शक्यता आहे, गुंतवणूकदार स्टॉकमधील संभाव्य नुकसान भरून काढण्यासाठी सोन्यात गुंतवणूक करत आहेत. काही शेअर बाजार विश्लेषकांच्या मते सध्याच्या वातावरणात अनेक गुंतवणूकदार हेजिंग स्ट्रॅटेजी म्हणून सोनं घेत आहेत. शेअर मार्केटमध्ये तोटा होण्याची भीती त्यांना आहे, त्यामुळे ते सोन्यात गुंतवणुकीचा पर्याय बघत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क लागू केल्यामुळे अनिश्चिततेचे वातावरण आहे. जेव्हा जगात अनिश्चितता असते, तेव्हा लोकांना सुरक्षितता हवी असते. जेव्हा सोन्याची मागणी वाढते तेव्हा त्याच्या किमती वाढतात.असे काही तज्ज्ञांचे मत आहे. वास्तविक, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच कॅनडा आणि मेक्सिकोमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के आणि चीनवर १० टक्के शुल्क लावण्याचे आदेश दिले होते. तथापि, डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडावर २५ टक्के शुल्क लागू करण्याची योजना ३० दिवसांनी पुढे ढकलण्याचे सांगितले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला सूट दिली नाही आणि युरोपियन युनियनवर शुल्क लादण्याबाबतही बोलले आहे. चीननेही अमेरिकेच्या वस्तूंवर कर लादून प्रत्युत्तर दिले आहे, म्हणजे भविष्यात टॅरिफ युद्धाची शक्यता बळावली आहे.

सोन्याच्या किमती वाढण्यामागे आणखी एक कारण आहे आणि ते म्हणजे जगभरातील केंद्रीय बँका सोन्याची खरेदी करत आहेत.डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याने आणि मध्यपूर्वेतील रशिया-युक्रेन युद्धांमुळे सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जात आहे. डॉलर हे एक मजबूत चलन आहे. २००७ ते २००९ दरम्यानच्या आर्थिक मंदीच्या काळात डॉलरची किंमत वाढली होती पण इतर चलनांमध्ये घसरण झाली

पान २ ▶



### योगासनात शुभमची 'गोल्ड'न कामगिरी

**उत्तराखंड :** उत्तराखंडातील ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत गोव्याच्या शुभम देबनाथने पारंपरिक योगासनात दुसऱ्यांदा सुवर्णपदकाला गवसणी घातली. गतवर्षी गोव्यात झालेल्या ३७व्या राष्ट्रीय स्पर्धेतही शुभमने पारंपरिक योगासनात सुवर्णपदकाची कमाई केली होती. गोव्यासाठी योगासनात दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकलेला शुभम देबनाथ हा मूळचा पश्चिम बंगालचा आहे.